जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 OCT 2023
पुढारी

# शाहूनगरीत साकारणार क्रीडा वसतिगृह

**कोल्हापूर : एकनाथ नाईक**

शाहूनगरीत क्रीडा वसतिगृह साकारणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ पुढे आले असून, स्वनिधीतून ५ कोटी १६ लाखांची तरतूद विद्यापीठाने केली आहे. १ एकर जागेत पुरुष व महिलांचे स्वतंत्र सुसज्ज ४०० बेडचे वसतिगृह उभारले जाणार आहे. त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, आराखडाही तयार झाला आहे. लवकरच वसतिगृह बांधकामाला सुरुवात होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. विद्यापीठाने खेळाडूंना प्रोत्साहन आणि पाठबळ दिल्यामुळे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदकांची लयलूट केली आहे. अखिल भारतीय ॲथलेटिक्स स्पर्धेत विद्यापिठाने पहिल्यांदाच जनरल चॅम्पियनशिप पटकाविली. तर नुकत्याच चायना येथे झालेल्या जागतिक स्पर्धेत पाच खेळाडू सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठ परिसरात भव्य मैदान असून विविध खेळ प्रकारांसाठी स्वतंत्र सुविधा येथे उपलब्ध आहेत. निधी उपलब्ध होईल तसा येथील क्रीडा विभागाचा लूक बदलू लागला आहे. निधीची वाट न पाहता स्वनिधीतून विद्यापिठाचा विकास साधण्यावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी लक्ष केंद्रित केले आहे. क्रीडा क्षेत्राकडे खेळाडूंचा कल वाढला आहे. त्यामुळेच क्रीडा विभागाला ५ कोटी १६ लाखांचा बूस्टर डोस देण्यात आला आहे.

या निधीतून क्रीडा वसतिगृहाची भव्य इमारत उभी राहणार आहे. मल्टीपर्पज हॉल, पार्किंग आदींचा यात समावेश आहे. विद्यापीठात खेळाडूंसाठी स्वतंत्र वसतिगृह नाही. त्यामुळे खेळाडूंना अन्य ठिकाणी रहावे लागत होते. या क्रीडा वसतिगृहामुळे खेळाडूंची राहण्याची सोय होईलच; पण वेळ, पैसा याचीदेखील बचत होणार आहे. वसतिगृहात राहिल्यामुळे खेळाडूंना सरावासाठी अधिकचा वेळ देता येईल.



- **शिवाजी विद्यापीठाच्या स्वनिधीतून आगळावेगळा उपक्रम**
- **५ कोटी १६ लाखांची तरतूद**
- **पुरुष- महिला खेळाडूंची स्वतंत्र व्यवस्था**
- **१ एकर जागेत सुसज्ज इमारत उभारणार**

**क्रीडा विभागाची कामगिरी**

| स्पर्धा | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|
| राज्यस्तरीय | ६ | ४ | ३५ |
| राष्ट्रीय | ६ | ४ | ० |
| आंतरराष्ट्रीय | ५ | ० | ० |

> “शिवाजी विद्यापीठाच्या एक एकर जागेत खेळाडूंसाठी क्रीडा वसतिगृह उभारण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या स्वनिधीतून ५ कोटी १६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी मिळाली असून, लवकरच कामाला सुरुवात होईल.
>
> **- प्रा. डॉ. शरद बनसोडे,**
> क्रीडा अधिविभागप्रमुख,
> शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2023
लोकमत

# डीवायपी साळोखेनगर येथे उद्योजक विकास चर्चासत्र

**कळंबा :** साळोखेनगर येथील डी वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात 'इन्स्टिट्यूशनस इनोव्हेशन कौन्सिल ६०' (आयआयसी)अंतर्गत उद्योजकता विकास व स्टार्टअप या विषयावर चर्चासत्र पार पडले.

प्रमुख वक्ते म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन आणि विकास फाउंडेशन विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आर. जी. पवार, लाईफलॉंग लर्निंगचे संचालक व शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे, कॅम्पस संचालक डॉ. अभिजित माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने उपस्थित होते. आर्थिक वाढीसाठी योजना राबविण्यासाठी उद्योजकतेच्या महत्त्वावर वक्त्यांनी विचार मांडले. चर्चासत्रास विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. आयआयसी अध्यक्ष डॉ. शिवानी काळे, पृथ्वीराज चव्हाण आणि आकाश साखरे यांच्या नेतृत्वाखाली उपक्रम आयोजित केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 OCT 2023
तरुण भारत

# विद्यापीठ परिसरात 'हाफ पँट'ला 'नो एंट्री'

## विद्यार्थीनींच्या तक्रारीनंतर पूर्वीच्याच निर्णयाची पुन्हा अंमलबजावणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्ञानाचे माहेर घर म्हणून शिवाजी विद्यापीठाची जशी ओळख आहे, तसेच ऑक्सिजन हब असल्याने पहाटेपासून या परिसरात फिरायला येणाऱ्यांची गर्दी असते. विद्यार्थीनी आणि महिलांची संख्याही उल्लेखनीय असल्याने विद्यापीठ परिसरात हाफ पँटवर फिरायला यायचे नाही, असा नियम यापूर्वीच केला होता. काही दिवसानंतर पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी परिस्थिती झाली आहे. हाफ पँटवर येणाऱ्यांसदर्भात विद्यार्थीनींकडून आलेल्या तक्रारी आणि अधिकार मंडळांच्या सूचनेनुसार पूर्वीच्या नियमांची पुन्हा अंमलबजावणी करीत, हाफ पँटवर फिरायला येण्यासाठी बंदी घातली आहे. परंतू रविवारी काही नागरिक सुरक्षा रक्षकांशी वाद घालत, दमदाटी करताना दिसले.



■ विद्यापीठातील सुरक्षा रक्षकांशी नागरिकांचा वाद

विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे पालन सुरक्षा रक्षकांची जबाबदारी आहे. त्यामुळे उद्यापासून हाफ पँट घालून फिरायला येऊ नये, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही, अशा सूचना सुरक्षा रक्षक देत होते. तर स्वत:चे आरोग्यदायी जीवन व्हावे, यासाठी विद्यापीठात फिरायला येणारे नागरिक मात्र सुरक्षा रक्षकाबरोबर वाद घालत होते. ऐवढेच नाही तर खेळाडू हाफ पँट वापरतात, त्यांना का बोलत नाही, असा उलट सवाल विचारत होते.

परंतू हे सर्व सुरक्षा रक्षकांना सुनावण्यापेक्षा फुल पँट घालून आले तर बिघडते कुठे? अशी चर्चा देखील फिरायला येणाऱ्या नागरिकांमध्ये होत होती. तर दुसरीकडे विद्यार्थीनी आणि महिलांनी मात्र विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले आहेत. कारण सकाळपासूनच विद्यापीठातील वर्ग किंवा प्रात्यक्षिक सुरू असतात. त्यानिमित्ताने अनेक विद्यार्थीनी वर्गात जाताना हाप पँटवाल्यांना पाहून संकुचित वाटत असल्याची तक्रार विद्यार्थीनींनी केली आहे. त्यामुळे पूर्वीच्याच नियमाची अंमलबजावणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

### विद्यार्थीनींच्या तक्रारी अन अधिकार मंडळाच्या सूचनेनुसार नियम लागू

विद्यार्थीनी सकाळपासून प्रात्यक्षिक करण्यासाठी वर्गात जात असतात. त्यामुळे विद्यापीठ परिसरात फिरायला कोणाला बंदी नाही पण व्यवस्थित कपडे घालून नागरिकांनी फिरायला यावे. विद्यार्थीनींच्या तक्रारी व अधिकार मंडळाच्या सूचनेनुसार पूर्वीच्या नियमांची अंमलबजावणी सुरू केली आहे. ज्यांना हाफ पँट घालायची आहे, त्यांनी क्रीडा मैदानावर फिरावे.

– डॉ. व्ही. एन. शिंदे (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

### विद्यापीठात येणाऱ्यांनी पोषाखाची आचारसंहिता पाळावी

विद्यापीठ परिसर विद्यार्थ्यांसाठी आहे, तरीही विद्यापीठात फिरण्यास कोणाला बंदी नाही. परंतू हाफ पँटवर फिरणाऱ्यांना पाहून मुली संकुचित होतात. परंतू त्या उघडपणे बोलू शकत नाहीत. त्यामुळे विद्यापीठात येणाऱ्या प्रत्येकाने पोषाखाची आचारसंहिता पाळली पाहिजे.

– स्वागत परूळेकर (सदस्य, व्यवस्थापन परिषद)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 OCT 2023
पुण्यनगरी

# छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास केंद्रास मंजूरी देण्याची मागणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास केंद्रास' मंजूरी देवून, भरघोस अनुदान द्या, या मागणीचे निवेदन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत परूळेकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, शिवाजी विद्यापीठ छत्रपती घराण्याच्या कार्यक्षेत्रात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा वारसा व परंपरा लाभलेला जिल्हा म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास केंद्रास' मंजुरी द्यावी. तसेच महात्मा बसवेश्वर अभ्यास केंद्रास मंजूरी द्यावी. दोन्ही महापुरूषांच्या अभ्यास केंद्रास आवश्यक तो निधी द्यावा. जेणेकरून विद्यार्थ्यांना दोन्ही महापुरूषांचा सविस्तर अभ्यास करता येईल. या निवेदनाचा विचार करून त्वरीत शिक्षण विभागाला सूचना देत दोन्ही अभ्यास केंद्र सुरू करावीत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 OCT 2023

पुण्यनगरी

# आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मंडलिक महाविद्यालयास उपविजेतेपद

**मुरगूड : प्रतिनिधी**

वडूज, जि. सातारा येथे झालेल्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांचा समावेश असलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत, आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूडच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाने उपविजेतेपद पटकावले.



दादासाहेब गोडसे आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूजच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूडच्या संघाने प्रथमतः वायसीएस कॉलेज कराड (सातारा) महाविद्यालयाच्या संघाला २५-४, २५-६ अशा गुण फरकाने पराभूत केले. डीजेजी कॉलेज वडूज (सातारा) संघाला २५-२२ व २३-२५, १५-८ असे पराभूत केले.

उपांत्यपूर्व साखळी सामन्यात एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड संघाला सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या संघाने २४-२६, २५-१८ व १५-८ अशा गुण फरकांनी पराभूत केले. उपांत्य फेरीतील सामन्यात देवचंद कॉलेजला मंडलिक महाविद्यालयाने २२-२५, २५-२२ व १५-८ अशा गुण फरकाने पराभूत करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम क्रमांकाच्या लढतीत एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाडबरोबर झालेल्या चुरशीच्या लढतीत २-१ अशा सेटनी पराभव पत्करावा लागून उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले. मंडलिक महाविद्यालयाकडून गजानन गोधडे, करण मांगले, विवेक चौगले, सत्यजित शिंदे यांची कडवी झुंज रोखण्यात कुरुंदवाड संघाला यश आले.

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या संघात करण मांगले, गजानन गोधडे, विवेक चौगले, सागर संकपाळ, सत्यजित शिंदे, विश्वजित रामाणे, जीवन गोधडे, साहिल चौगले, पीयूष साळोखे, निखिल सावंत, रवींद्र हळदकर यांचा समावेश होता. त्यांना प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. शिवाजी पोवार, व्हॉलीबॉल प्रशिक्षक, माजी प्राचार्य महादेव कानकेकर, संभाजी मांगले, अजित गोधडे, विनोद रणवरे, श्रावण कळांद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2023

सकाळ



देवचंद कॉलेज : आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविलेल्या संघासोबत प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे. या वेळी इतर मान्यवर उपस्थित होते.

# व्हॉलीबॉलमध्ये देवचंद महाविद्यालय तृतीय

नानीबाई चिखली : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा दादासाहेब गोडसे महाविद्यालय वडूज (जि. सातारा ) येथे झाल्या. चुरशीने झालेल्या या सामन्यात अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाच्या पुरुष संघाने डी. आर. माने महाविद्यालय कागलचा २ -० ने पराभव करीत तृतीय क्रमांक पटकावला. अनुप पाटील याच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या संघात पवन पाटील, गजानन शिंगाडी, इंद्रजित मगदूम, बंदिश खोत, अनिकेत साळुंखे, विवेक साळुंखे, अभिषेक भुरले यांनी दर्जेदार खेळाचे सांघिक प्रदर्शन केले. विजयी संघाला जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शहा, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शहा, खजिनदार सुबोध शहा, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत शाह तसेच जिमखाना विभागातील सर्वांचे मार्गदर्शन लाभले.